21/11/24

वेळ: २ ½ तास                                                                                  गुण: ८०

सूचना: १.सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
२. उजवीकडील अंक गुण दर्शवितात.

प्रश्न १. अ) भाषांतर म्हणजे काय हे सांगून भाषांतराची व्याप्ती लिहा. २०

**किंवा**

आ) कवितेचे भाषांतर करणे ही अधिक कठीण गोष्ट असते, चर्चा करा.

प्रश्न २. अ) ललित साहित्याचे भाषांतर करताना येणाऱ्या भाषिक समस्यांचा परामर्ष घ्या. २०

**किंवा**

आ) ललित साहित्याचे भाषांतर करताना 'शैली हा घटक महत्त्वाचा ठरतो, थोडक्यात विशद करा.

प्रश्न ३. अ) पुढीलपैकी एका इंग्रजी किंवा हिंदी उताऱ्याचे सुबोध मराठीत भाषांतर करा. १०

अ) All the people sitting in that big auditorium were looking worried. The Earth had to face a horrid catastrophe, for two days. Raman said, "Gentlemen! We will make an appeal to all the people through the media that they should remain in their houses and not to come out for these two days." "Yes, you are right!" Nag also agreed this. He said, "The Earth is going to pass through stripe, and it will take two days, i.e.,48 hours to cross this area." Norma pair stood up and showed the area of carbon stripe on big screen. That night, all the news channels were delivering the same breaking News. "The Earth is going to experience the thrill of night at daytime!" And the next day passed away in darkness. There were clouds of black dust.

**किंवा**

शिक्षा किसी भी व्यक्ति के जीवन में एक महत्वपूर्ण भूमिका निभाती है। यह न केवल हमें ज्ञान प्रदान करती है, बल्कि हमारे व्यक्तित्व का विकास भी करती है। शिक्षा के माध्यम से हम अपने समाज में सम्मान और प्रतिष्ठा प्राप्त कर सकते हैं। यह हमें आत्मनिर्भर बनाती है और हमारे आत्मविश्वास को बढ़ाती है। शिक्षा से हमें सही और गलत का ज्ञान होता है और हम अपने निर्णयों को विवेकपूर्ण ढंग से ले सकते हैं। इसलिए, शिक्षा हर व्यक्ति के जीवन में अत्यंत आवश्यक है और हमें इसे गंभीरता से लेना चाहिए।

आ) पुढील मराठी उताऱ्याचे इंग्रजी **किंवा** हिंदीत भाषांतर करा. १०

मनाला केवळ आनंद देणे किंवा मनाचे निव्वळ रंजन करणे हाच कलेचा हेतू आहे असे म्हणणाऱ्या अडाणी माणसांची कीव करावीशी वाटते. त्यांना निसर्गाच्या उत्क्रांतिमय जीवनाचे रहस्य मुळीच कळलेले नाही. असे म्हणावयास पाहिजे. सुंदर चित्र पाहिल्याने, मधुर संगीत ऐकल्याने किंवा उत्कृष्ट मूर्ती पाहिल्याने आपल्याला आनंद तर होतोच होतो. पण त्यामुळे आपली जीवनशक्ती अधिक समृद्ध होते.



79X548YF11879X548YF1 muquestionpapers.com

भावनांचा विकास होतो आणि बुद्धीची उत्क्रांती होते. कलेच्या उपभोगाने आपण अधिक सुखी, अधिक तृप्त, अधिक उन्नत होतो. म्हणून निसर्गाच्या उत्क्रांतीचे अपरिहार्य कार्य चालू ठेवणे, हेच कलावंताच्या आयुष्याचे ध्येय आहे.

म्हणूनच समाजाच्या आनंदासाठी, प्रगतीसाठी आणि उद्धारासाठी कलेची आणि कलावंताची आवश्यकता आहे. कलावंताच्या पावलांनी समाज चालत असतो. कलावंताच्या डोळ्यांनी समाज पाहात असतो, कलावंताच्या बुद्धीने समाज विचार करीत असतो.

प्रश्न ४. अ) १.पुढील प्रशासकीय पारिभाषिक शब्दांच्या जोड्या जुळवा. १०

| "अ" गट | "ब" गट |
| --- | --- |
| १. Reservation | अ) भाषण |
| २. Speech | आ) माहितीपट |
| ३. Active | इ) निबंध |
| ४. Documentary | ई) आरक्षण |
| ५. Advanced | उ) प्रगत |
| ६. Essay | ऊ) सक्रिय |
| ७. Inchrge | ए) अनावृत्त पत्र |
| ८. Open Letter | ऐ) प्रभारी |
| ९.Temporary | ओ) अनुदान |
| १०.Agenda | औ) कार्य सूची |

२. खालील पारिभाषिक संज्ञाना मराठी योग्य पर्याय द्या. १०

१. Fellowship
२. Magazine
३. Orientation
४. Press Note
५. Synopsis

किंवा

आ) पुढीलपैकी कोणत्याही दोन टिपा लिहा. २०

१. कोशांच्या नोंदी
२. कोशांचे महत्त्व
३. अकारविल्हे
४. सूची

---